# महाराष्ट्र शासन
# धर्मादाय सह आयुक्त
# बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांचे कार्यालय

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई
१ ला मजला, सास्मीरा इमारत,
सास्मीरा रोड, वरळी,
मुंबई - ४०० ०३०.
दूरध्वनी क्रमांक : ०२२ – २४९३५४३४, २४९३५४९०
२४९३०४९९, २४९३५५१६

Public Trusts Registration Office,
Greater Mumbai Region, Mumbai,
1st Floor. Sasmira Building,
Sasmira Road, Worli,
Mumbai – 400 030.
Tel No. 022- 24935434, 24935490
24930499, 24935516
Website:charity.maharashtra.gov.in

---

जा.क्र. स.ध.आ.-७/ 16/2024 दिनांक 01/01/2024

सहायक धर्मादाय आयुक्त – ७ सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई.

विषय :- न्यासाचे नाव – "Osho International Foundation"
अर्ज क्र. ०२/२०२१, U/s – ३६(१)(a)
न्यास नोंदणी क्र . F – १४५७० (Mumbai)

संदर्भ :- १. न्यायलिपिक (स.ध.आ.-७ यांचे) यांची दिनांक ०१.०१.२०२४ रोजीची कार्यालयीन अंतर्गत टिप्पणी.
२. जाहीर नोटीस जा.क्र. ९९२३/२३, दिनांक १५.१२.२०२३.
३. मा. धर्मादाय सह आयुक्त – १, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे चौकशी अर्ज क्र. ०२/२०२१ मध्ये दिनांक ०७.१२.२०२३ रोजी पारित केलेले आदेश.

## <u>जाहीर नोटीस</u>

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आज दिनांक ०१.०१.२०२४ रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे की, मा. धर्मादाय सह आयुक्त – १, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे चौकशी अर्ज क्र. ०२/२०२१ मध्ये दिनांक ०७.१२.२०२३ रोजी पारित केलेल्या अंतिम आदेशाप्रमाणे या अधिकारीणीस "Osho International Foundation" सा. न्यास नोंदणी क्र. F – १४५७० (मुंबई) या न्यासाच्या सन २००५ ते २०२३ या कालावधीचे विशेष लेखापरिक्षणाकरीता दोन लेखापरिक्षकांची नियुक्ती करावी असे आदेशित करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने सदर "Osho International Foundation" या न्यासाचे विशेष लेखापरिक्षणाकरीता संबंधित इच्छुक नोंदणीकृत लेखापरिक्षकांनी सहायक धर्मादाय आयुक्त – ७ या अधिकारीणीकडील निरीक्षक श्री. रा.दं. पवार यांचेकडे दिनांक

२९.१२.२०२३ पर्यंत योग्य त्या कागदपत्रांसहीत अर्ज सादर करावेत असे सूचित करण्यात आलेले होते. परंतु, सदर विहीत मुदतीमध्ये एक अर्ज प्राप्त झालेला आहे. मा. धर्मादाय सह आयुक्त – १ यांच्या आदेशाप्रमाणे दोन लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. करीता सदर न्यासाच्या विशेष लेखापरीक्षणाकरीता अर्ज मागविणे संदर्भात दिनांक ०३.०१.२०२४ पर्यंत मुदत वाढवून देण्यात येत आहे. विहीत मुदतीमध्ये प्राप्त झालेल्या अर्जांमधून योग्य त्या दोन लेखापरिक्षकांची विशेष लेखापरिक्षणाकरीता निवड करण्यात येईल याची सर्व लेखापरिक्षकांनी नोंद घ्यावी. दिनांक ०३.०१.२०२४ नंतर प्राप्त झालेले अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही. दिनांक ०३.०१.२०२४ पर्यंत जे लेखापरिक्षक अर्ज सादर करतील त्यांनी दिनांक ०४.०१.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता पुढील योग्य त्या कार्यवाहीकरीता सहायक धर्मादाय आयुक्त – ७, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांचे दालनामध्ये मुळ कागदपत्रांसहीत उपस्थित रहावे.

उपरोक्त प्रमाणे नोटीस ही धर्मादाय आयुक्त कार्यालय महाराष्ट्र राज्य, मुंबई, धर्मादाय सह आयुक्त कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांचे सुचनाफलक तसेच मा. धर्मादाय आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्या https://charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर आज दिनांक ०१.०१.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता :-
निरीक्षक (न्यायलिपिक)
सहायक धर्मादाय आयुक्त – ७ यांचे न्यायालय
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई
१ ला मजला, सास्मीरा इमारत,
सास्मीरा रोड, वरळी,
मुंबई - ४०० ०३०.
दूरध्वनी क्रमांक : ०२२ – २४९३५४३४, २४९३५४९०

(राम अ. लिप्ते)
सहायक धर्मादाय आयुक्त – ७,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई.

ठिकाण :- मुंबई
दिनांक :- ०१.०१.२०२४

प्रतिलिपी :- संगणक शाखा यांचे माहितीस्तव तथा संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.